# मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी मध उत्पादकांच्या 'फार्मर्स प्रोड्युसर कंपन्यां'ची स्थापना

मधमाशी पालन या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाच्या पातळीवरून चांगल्या प्रकारे प्रयत्न होत आहेत. मधमाशी पालन आणि कृषी व्यवसाय यांचा अत्यंत जवळचा संबंध असल्यामुळे मधमाशी पालन व्यवसायाचा आता केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत सहभाग झाला आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद तसेच कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत नॅशनल बी बोर्डाची स्थापना तसेच राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियानाची सुरुवात झालेली आहे. शेतकऱ्यांना





संघटित करून कृषी व कृषिपूरक व्यवसायांची उत्पादन वाढ, प्रक्रिया तसेच विक्री व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी 'फार्मर्स प्रोड्युसर कंपन्या' म्हणजेच एफ.पी.ओ.ची स्थापना मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या भांडवलातून तसेच केंद्र शासनाच्या मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या अनुदानातून या कंपन्या सुरू झाल्या आहेत आणि होत आहेत. अनेक कृषिपूरक व्यवसायांसाठी अशा कंपन्यांची स्थापना झाली आहे. परंतु मधमाशी पालन या व्यवसायासाठी असा प्रयोग पहिल्यांदाच सुरू झाला. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते अशा प्रकारच्या पाच शेतकरी कंपन्यांचे उद्घाटन नाफेडच्या माध्यमातून बिहारमधील पूर्व चंपारण्य, मध्य प्रदेशातील मोहेना, राजस्थानमधील भरतपूर, उत्तर प्रदेशमधील मथुरा आणि पश्चिम बंगालमधील सुंदरबन या ठिकाणी झाले आहे. या पाच कंपन्यांद्वारे कमीत कमी ४००० ते ५००० मध उत्पादकांना फायदा होणार आहे. मधमाशी पालन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा सुविधांचा पुरवठा करणे, तयार झालेले मध आणि इतर पदार्थांवर प्रक्रिया करून त्यांची विक्री करणे यासारखे उपक्रम या मध उत्पादन कंपन्यांमध्ये होणार आहे. निश्चितच अशा प्रकारच्या या उपक्रमाचा फायदा झाला तर या कंपन्यांचे अनुकरण देशातील इतर मधमाशी पालक करतील आणि त्यांच्या कंपन्या तयार होतील. मधमाशी पालन व्यवसायाला पुढे घेऊन जाण्यासाठी अशा प्रकारच्या सांघिक प्रयत्नांची गरज आहे.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

मधुवार्ता

# मधमाशीवरील 'वरोआ माईट्स'चे जैविक पद्धतीने नियंत्रण



मधमाशीवर येणाऱ्या वरोआ माईट्समुळे मधमाश्यांच्या वसाहती पूर्णपणे नष्ट होतात. पूर्ण जगाला या समस्येमुळे मधमाश्यांच्या लाखो वसाहतींना मुकावे लागते. मधमाशी पालनात 'कॉलनी कॉलॅप्स डिसिज्' (सीसीडी) या रोगामुळे नष्ट होतात. यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो तो म्हणजे वरोआ माईट्. अत्यंत बारीक असा हा माईट् ज्याला आपण कोळी म्हणू तो मधमाशीच्या अंगावर चिकटून बसतो आणि तिचे रक्त पितो. तसेच मधमाशीच्या वसाहतीमध्ये जास्त काळ राहून मधमाशीची प्रतिकार क्षमता कमी करतो. यामुळे मधमाश्यांना इतरही रोग होऊन हळूहळू वसाहतीमधील मधमाश्यांची संख्या कमी होऊन नंतर पूर्ण वसाहत नष्ट होते. यालाच सीसीडी म्हणतात. यामुळे जगामध्ये दरवर्षी



लाखो वसाहती नष्ट होतात. अमेरिकेमध्ये मधमाशी पालन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात व्यावसायिक तत्त्वावर केला जातो. मधमाशीपासून मध आणि इतर उत्पादन घेण्याबरोबरच मधमाशीचा परागीभवनासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे एकाच ठिकाणी हजारो वसाहती ठेवल्या जातात. दरवर्षी अमेरिकेमध्ये ३० ते ४० टक्क्यांपर्यंत मधमाशीच्या वसाहती सीसीडीमुळे नष्ट होतात. मधमाशी पालन शाश्वत होण्यासाठी तेथे मोठ्या प्रमाणात संशोधनही केले जाते. वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीमधील शास्त्रज्ञ जेनिफर हॅन आणि त्यांच्या टीमने मागील दोन वर्षांपासून ही समस्या कमी करण्यासाठी आणि वरोआ माईट्सचे नियंत्रण करण्यासाठी संशोधन केले. सर्वसाधारणपणे या माईट्सचे नियंत्रण करण्यासाठी कोळीनाशक औषधांचा वापर केला जातो. परंतु सतत या औषधांचा वापर केल्यामुळे वरोआ माईट्सची प्रतिकारक्षमता वाढते आणि त्यामुळे त्यांचे नियंत्रण होत नाही. जैविक कीटकनाशकांचा वापर करून अधिक प्रकारचे कीडनियंत्रण करण्याचे काम आज जगामध्ये अनेक पिकांमध्ये केले जाते. याचाच विचार करून मेटाराईझियम या जैविक कीटकनाशकाचा वापर मधमाशीवरील वरोआ माईटचे नियंत्रण करता येईल काय, यावर प्रयोग झाले. मधमाशीच्या वसाहतीमध्ये तापमान सर्वसाधारणपणे जास्त असते. मेटाराईझियम जास्त तापमानात तग धरू शकत नाही. सर्वसाधारणपणे ३५ अंश सेल्सियस तापमानात जिवंत राहू शकेल, अशा प्रकारची क्षमता मेटाराईझियममध्ये असावी यासाठी जेनिफर आणि त्यांच्या टीमने विविध भागातील जमिनीतून मेटाराईझियमचे नमुने गोळा केले. यातून त्यांना काही चांगल्या प्रकारच्या प्रजाती सापडल्या, ज्या ३५ अंश सेल्सियस तापमानाला जगू शकतात. याचा वापर करून मधमाश्यांच्या वसाहतींमध्ये असलेले वरोआ माईट्स पूर्णपणे नियंत्रित करण्यात त्यांना यश आले. लवकरच प्रत्यक्ष शेतामध्ये याचा वापर करण्यासाठी त्यांनी परवानगी मागितली आहे. पुढील काही वर्षांत अमेरिकेमध्ये वरोआ माईटस्च्या नियंत्रणासाठी मेटाराईझियम या जैविक कीटकनाशकाचा मोठ्या प्रमाणात वापर होईल, असे जेनिफर यांच्या टीमला वाटते.

(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)